फोन नं. (02164) 272414, 8275706613
Web : http://gcekarad.ac.in
Email: principal@gcekarad.ac.in,
principal.gcoekarad@dtemaharashtra.gov.in

महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कराड

*(महाराष्ट्र शासनाची स्वायत संस्था)*

विद्यानगर, कराड पिन – ४१५१२४ जि. सातारा

जा.क्र.शाअमक/विद्यार्थी विभाग/२०२५-२६/ 2374 दिनांक – 22 JUL 2025

## सूचना (अत्यंत महत्वाची) स्मरणपत्र - १

**विषय - शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता Carry on लागू करणेबाबत...**

संदर्भ – १. महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन आदेश क्र. संकीर्ण-२०२५/ई-९७०२२०/विशि-३ दि. १०/०२/२०२५
२. संस्थेचे परिपत्रक जा.क्र.शाअमक/विद्यार्थी विभाग/२०२४-२५/८५९ दि.०१/०३/२०२५
३. संस्थेचे परिपत्रक (स्मरणपत्र)जा.क्र.शाअमक/विद्यार्थी विभाग/२०२४-२५/१७३१ दि.०२/०५/२०२५

उपरोक्त संदर्भांचे विषयानुसार संस्थेतील सर्व शाखांचे व अभ्यासक्रमांचे सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता अभियांत्रिकी अभ्यासक्रमासी संबंधित विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांनी Carry on सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. अ.क्र. १ संदर्भीय निर्णयानुसार खालील निर्देशा प्रमाणे Carry on सुविधा घेण्यास विद्यार्थी पात्र राहतील.

१. प्रथम वर्षामध्ये अनुतीर्ण असणा-या विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाच्या ५ व्या सत्राकरिता, व्दितीय वर्षामध्ये अनुतीर्ण असणा-या विद्यार्थ्यांना चतुर्थ वर्षाच्या ७ व्या सत्राकरिता तसेच वरील वर्गात प्रवेश देण्याची पात्रता ही सम सत्र २०२३-२४ (म्हणजे उन्हाळी परीक्षा २०२३-२४) च्या परीक्षांच्या निकाला ऐवजी विषम सत्र २०२४-२५ (म्हणजे हिवाळी परीक्षा २०२४-२५) च्या निकालांवर ठरवण्यात येईल.

२. वरील प्रमाणे पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या विषम (हिवाळी) व (उन्हाळी) सत्राच्या परीक्षा एकत्रित सम (उन्हाळी) सत्राच्या परीक्षांसोबत घेण्यात येतील.

३. अ.क्र. १ नुसार वरील वर्गात प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांचे विषम सत्राचे अभ्यासक्रम पुर्ण करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील. आणि यासाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयामध्ये हमीपत्र भरुन देणे अनिर्वाय आहे.

सदरचे निर्णय हे फक्त शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता लागू राहतील याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

तसेच ज्या विद्यार्थ्याना Carry on सुविधा घ्यावयाची आहे. परंतू अद्याप संदर्भ क्रमांक २ नुसार अर्ज केलेले नाहीत. अशा विद्यार्थ्यांना मुदतवाढवून देण्यात येत आहे. तरी संबंधित विद्यार्थ्यांनी दिनांक ३१/०७/२०२५ पर्यंत शैक्षणिक अधिष्ठाता कार्यालय (विद्यार्थी विभागात) अर्ज सादर करावेत तद्नंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड.

प्रत - संस्थेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेसाठी व सर्व विभागांचे सूचना फलकावर लावणेसाठी.